# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१२ – १३

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

सकाळ पुणे जिल्हा
सोमवार, ७ जानेवारी २०१३ ३




राजगुरुनगर (ता. खेड) : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी जागर जाणिवांचा अभियानांतर्गत स्त्रीभ्रूणहत्येविरोधात पथनाट्य सादर केले.

# राजगुरुनगरमध्ये 'जागर जाणिवांचा' रॅली

**राजगुरुनगर, ता. ६ :** येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने, स्त्रियांवरील अत्याचाराचा निषेध करण्यासाठी 'जागर जाणिवांचा' रॅलीचे आयोजन करून स्त्रीभ्रूणहत्या व स्त्री-पुरुष समानतेवर पथनाट्ये सादर करण्यात आली. रॅलीत ८०० विद्यार्थिनी भगवे फेटे बांधून सहभागी झाल्या होत्या.

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, इर्जिक इंडिया फाउंडेशनचे अध्यक्ष साई शिंदे, शिवसेना महिला संघटक विजया शिंदे, ऊर्मिला सांडभोर, प्राचार्य डॉ. पी. के. कोरडे यांच्या उपस्थितीत रॅलीला प्रारंभ झाला. अन्याय सहन करणार नाही, अन्याय होऊ देणार नाही, स्त्री शक्तीचा जयजयकार अशा विविध घोषणा देत ही रॅली संपूर्ण शहरातील मिरवणूक मार्गाने काढण्यात आली.

ठिकठिकाणी पथनाट्ये सादर करण्यात आली. तहसीलदारांना निवेदन देऊन रॅलीचा समारोप करण्यात आला. अभियानाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळुक, प्रा. स्मिता कोळेकर यांनी केले.

लोकमत Hello पुणे जिल्हा 3
मंगळवार
दि. ८ जानेवारी २०१३

# स्त्री भ्रूण हत्या जणजागृतीसाठी रॅली

राजगुरुनगर| दि. ७ (वार्ताहर)

हुतात्मा राजगुरुन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रीभ्रूणहत्या याबाबत समाजजागृती होण्यासाठी 'जागर जाणिवांचा' या रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

याबाबत रॅलीत ८०० मुलींनी सहभाग घेतला. रॅलीचा प्रारंभ खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी इर्जिक इंडिया फाउंडेशनचे अध्यक्ष साई शिंदे, शिवसेनेच्या जिल्हा महिला आघाडीप्रमुख विजया शिंदे, उर्मिला सांडभोर, प्राचार्य डॉ. पी.के. कोरडे, आदी उपस्थित होते. अन्याय सहन करणार नाही, अन्याय होऊ देणार नाही, निषेध असो, निषेध असो, मुलांपेक्षा मुलगी बरी, सुख-समृद्धी दोन्ही घरी, लेक वाचवा, अशा घोषणा रॅलीतून देण्यात आल्या. यावेळी, मुलींनी विविध पथनाट्य, गीते सादर केली.

या अभियानाचे आयोजन डॉ. संजय शिंदे, प्रा. दिलीप मुळुक, प्रा. स्मिता कोळेकर यांनी केले. यात सर्व महिला प्राध्यापक, एम. एस. एस. व एन.सी. सी विद्यार्थी कल्याण मंडळ यांनी सहभाग घेतला.




▼ हुतात्मा राजगुरुन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रीभ्रूणहत्या याबाबत समाजजागृती होण्यासाठी 'जागर जाणिवांचा' यावर जाढण्यात आलेली रॅली.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख